N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** ठाणे शहर **P.S.(ठाणे):** डायघर **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0174 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 09/05/2019 01:29 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7, 7 अ |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 08/05/2019
**Date To ( दिनांक पर्यंत):** 08/05/2019
**Time From (वेळेपासून):** 14:45 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:45 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 08/05/2019 **Time (वेळ):** 16:35 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद** 005 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 09/05/2019 01:29 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 4 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** नागाव पो दहीसर ता जि ठाणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):** डायघर
**District(State) (जिल्हा(राज्य)):** ठाणे शहर(महाराष्ट्र)

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अब्दुलसाबीर अब्दुलहकीम शाह

(b) **Guardian's Name (पालक का नाव) :** अब्दुलहकीम

(c) **Date/Year of Birth (जन्म** 1988 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**
**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**



Scanned by CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 102,जुना मुंबई पुणे रोड,मदिना अपा ,मुंब्रा ,ठाणे ,डायघर,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 102,जुना मुंबई पुणे रोड,मदिना अपा ,मुंब्रा ,ठाणे ,डायघर,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रभाकर गजानन मढवी गजानन मढवी | | पालक का नाम : गजानन | 1. 1103 ,सेक्टर 8 ,सत्यम हाइटस, कळंबोली ,पनवेल,डायघर,ठाणे शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | देवेंद्र दिलीप देशमुख | | पालक का नाम : दिलीप | 1. रुम नं 9 ,सेक्टर 3 के एल 5 ,बिल्डिंग नं 2 ,कळबोली ,पनवेल जि रायगड, डायघर,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 3 | उद्यराज चंद्रकान्त शेळके चंद्रकान्त शेळके | | पालक का नाम : चंद्रकान्त | 1. 102,ए विंग न्यु साई पार्क ,बिरला कॉलेज जवळ ,भोईरवाडी ,कल्याण पश्चिम ,डायघर,ठाणे शहर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

फिर्याद दिनांक 09/05/2019मी अब्दुलसाबीर अब्दुलहकीम शाह, रा. मदीना अपार्टमेन्ट, रूम नं. 102, किस्मत कॉलनी , जुना मुंबई पुणे रोड, मुंब्रा, जि. ठाणे समक्ष हजर राहून फिर्याद लिहुन देतो की,माझे शिक्षण मदरसामध्ये झाले असल्याने मला फक्त उर्दु भाषाच लिहीता येते. मी जन्मापासून मुंबईमध्ये राहण्यास असल्याने मला मराठी व हिंदी भाषा वाचता येते परंतु, लिहीता येत नाही. माझा मोकळया जागा खरेदी विक्रीचा व्यवसाय असून त्यावर माझ्या कुटूंबियांचा उदरनिर्वाह चालतो.मी दहिसर, नागाव, डायघर येथे सव्र्हे क्र. 230 येथील 05 गुंठे मोकळी जमीन सन 2017 मध्ये श्री. जयवंत भोईर यांच्याकडून खरेदी केलेली आहे. परंतु, सदर खरेदीखत झाल्यानंतर माझ्या लक्षात आले की, सदर जागा ही एका आदीवासी महिलेच्या नावावर असून ती माझ्या नावावर होणार नाही. त्यामुळे सदर जागेवर मी सन 2018 मध्ये दहा खोल्यांचे बांधकाम सुरू केले होते. त्यापैकी पाच खोल्या बांधून तयार झाल्या आहेत व उर्वरीत 5 खोल्यांचे बांधकाम सध्या सुरू आहे. बांधलेल्या खोल्या मला विकायच्या असल्याने व खोल्या विकत घेण्यासाठी येणारे लोक घरपटटी बाबत विचारणा करत असल्याने मी सदर 10 खोल्यांची घरपटटी लावुन घेण्याकरीता नागाव ग्रामपंचायत कल्याण येथे लेखी अर्ज दिनांक 04/05/2019 सादर केला.मी नागाव ग्रामपंचायत येथे दिनांक 04/05/2019 रोजी घरपटटी लावुन घेण्याकरीता अर्ज देण्यासाठी गेलो असता माझी सदर ग्रामपंचातीमध्ये ग्रामसेवक श्री. उदयराज शेळके यांचेशी भेट झाली. मी त्यांना माझ्या सर्वे नंबर 230 येथील जागेवर बांधलेल्या खोल्यांकरीता घरपटटी लावुन देण्याबाबत विनंती केल्यावरून त्यांनी माझी तेथे हजर असणारे एक अनोळखी इसम यांचेशी ओळख करून दिली व ते नागाव ग्रामपंचायतीच्या सरपंच महिलेचे पती असल्याचे सांगितले. तसेच मला घरपटटी बाबत सदर सरपंच महिलेचे पतींशी बोलणी करण्यास सांगितले. मी सदर सरपंच महिलेच्या पतीशी माझ्या खोल्यांच्या घरपटटी बाबत बोलणी केली असता त्यांनी एका खोली करीता 25000/- रूपये प्रमाणे 10 खोल्यांचे 2,50,000/- रूपये लागतील असे सांगितले.माझ्या माहिती प्रमाणे खोल्यांच्या घरपटटीची रक्कम इतकी मोठी नसल्याने सदर सरपंच महिलेचा



Scanned by CamScanner

पती हा माझ्याकडे ग्रामसेवक श्री. उदयराज शेळके यांच्या सहमतीने लाच मागत असल्याची खात्री झाली. मात्र मला ग्रामसेवक शेळके व सरपंच महिलेचा पती यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी सदर बाबत दिनांक 04/05/2019 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे येथे जावून पोलीस उप अधीक्षक श्रीमती कुलकर्णी यांचेकडे लेखी तक्रार दिली. मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्याकरीता पोलीस उप अधीक्षक श्रीमती कुलकर्णी हया पडताळणी पथकासह दिनांक 06/05/2019 रोजी मला मुंब्रा येथे भेटल्या. त्यावेळी पडताळणी पथकात दोन शासकीय पंच साक्षीदार उपस्थित होते. मला पो. उप अधीक्षक श्रीमती कुलकर्णी यांनी उपस्थित पंच व पडताळणी पथकातील अंमलदार यांची ओळख करून दिली. मी माझी तक्रार उपस्थित पंचांना थोडक्यात सांगितली. त्यानंतर पंचांच्या उपस्थितीत सर्व कायदेशीर बाबींचा अवलंब करून मला पंच 1 श्री. विनोद आयवळे यांचेसह माझ्याकडे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर देवून लाचेच्या मागणीची पडताळणी करण्यासाठी लोकसेवक श्री. उदयराज शेळके यांची भेट घेण्यासाठी नागाव ग्रामपंचायत कार्यालय येथे पाठविण्यात आले. मी व पंच श्री आयवळे असे माझी दुचाकी गाडीने नागाव ग्रामपंचायत येथे जात असताना रस्त्यामध्येच ग्रामसेवक श्री. शेळके व सरपचांचे पती यांच्याशी माझी भेट झाली. मी ग्रामसवेकांशी माझ्या रूमच्या घरपटटीबाबत बोलणी केली असता त्यांनी मला माझ्या जागेबाबत केलेल्या करारनाम्याची प्रत तसेच सातबारा उतारा अशी कागदपत्रे घेवून येण्यास सांगितली. तसेच सरपंच महिलेचे पती यांच्याशीबोलणी करण्यास सांगितले. त्यावरून मी सदर सरपंच महिलेच्या पतीची भेट घेतली असता मला त्यांचे नाव प्रभाकर मढवी असल्याचे समजले त्यांनी मला प्रत्येकी 25000/- रूपये प्रमाणे दोन खोल्यांचे 50000/- रूपये संध्याकाळ पर्यत घेवून या व घरपटटी पावती घेवून जा असे सांगितले.दिनांक 06/05/2019 रोजी माझ्याकडे प्रभाकर मढवी यांनी सांगितल्याप्रमाणे 50,000/- रू. उपलब्ध नसल्याने पोलीस उप अधीक्षक श्रीमती कुलकर्णी यांनी मला रू. 50,000/- ची तजवीज करण्यास सांगून त्या दिवशी पुढील कारवाई तुर्तास थांबवली. दिनांक 08/05/2019 रोजी माझ्याकडे रूपये 50,000/- उपलब्ध झाल्यावरून मी सदर रक्कम घेवून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे कार्यालयात हजर झालो. त्यावरून पो. उप अधीक्षक श्रीमती कुलकर्णी हयानी सर्व कायदेशीर बाबींचा अवलंब करून सापळापुर्व कारवाई करून मला ग्रामसेवक श्री. शेळके व खाजगी इसम प्रभाकर मढवी यांना त्यांच्या मागणी प्रमाणे लाचेची रक्कम रूपये 50,000 देण्याकरीता नागाव ग्रामपंचायत कल्याण येथे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावुन पंच श्री. आयवळे यांचे सह पाठविण्यात आले.सापळा कारवाई दरम्यान ग्रामसेवक श्री. उदयराज शेळके यांनी माझ्याकडे 1 लाख रूपयांची मागणी केली. परंतु माझ्याकडे फक्त 50,000 /- रू. असल्याचे मी त्यांना सांगितले. त्यावर ग्रामसेवक शेळके यांनी 50,000/- रू. प्रभाकर मढवी यांचेकडे देण्यास मला सांगितले. मी प्रभाकर मढवी यांना लाचेची रक्कम देण्यासाठी पुढे केली असता मढवी यांचेसोबत असणारे एका अनोळखी इसमाने मला दोन खोल्यांच्या घरपटटीच्या पावत्या हातात दिल्या व माझ्या हातातून लाचेची रक्कम काढून घेतली. सदर सापळा कारवाईदरम्यान नागाव ग्रामपंचायतीचे प्रवेषद्वारासमोर दिनांक 08/05/2019 रोजी दुपारी 14.45 वा. ग्रामसेवक उदयराज शेळके, प्रभाकर मढवी व एक अनोळखी इसम यांना सापळा कारवाई पथकाने रंगेहात पकडले.माझ्याकडून लाचेची रक्कम स्विकारणाया अनोळखी इसमाच्या पंटच्या पुढील डाव्या बाजूच्या खिषातून लाचेची रक्कम हस्तगत करण्यात आली त्यातील नोटांचे क्रमांक पडताळून पाहिले असता ते सापळापुर्व कारवाईदरम्यान नोंदविलेल्या क्रमांकाषी जुळून आले. अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाषात केलेल्या तपासणीमध्ये हस्तगत केलेल्या लाचेच्या नोटांवर व लाचेची रक्कम स्विकारणाया अनोळखी इसमाच्या दोन्ही हातावर आणि त्याने परिधान केलेल्या पन्टच्या डाव्या खिषाच्या कडांवर व आतिल बाजुस अँथ्रासीन पावडरचे गुणधर्म अढळून आले. माझ्याकडून लाचेची रक्कम स्विकारणाया अनोळखी इसमाचे नाव देवेंद्र दिलीप देषमुख असे असल्याचे मला सापळा कारवाई नंतर समजले.ग्रामसेवक उदयराज चंद्रकांत षेळके, वय 36 वर्षे, ग्रामसेवक, नागाव ग्रामपंचायत, ता. जि. ठाणे, रा. 102, ऐ विंग, न्यु साई पार्क, बिर्ला कॉलेज जवळ, भोईरवाडी, कल्याण पश्चिम, जि. ठाणे यांनी लोकसेवक या नात्याने त्यांना मिळालेल्या अधिकाराचा व पदाचा दुरूपयोग करून मला दोन खोल्यांना घरपटटी आकारून त्याची पावती बनवून देण्यासाठी खाजगी इसम श्री. प्रभाकर गजानन मढवी, वय 42 वर्षे, रा. 1103, सत्यम हाईटस्, सेक्टर 8, कळंबोली, ता. पनवेल, जि. रायगड यांच्या मार्फतीने प्रथम 50,000/- रू. ची मागणी करून दिनांक 08/05/2019 रोजी स्वतः 1 लाख रू. लाचेची मागणी करून तडजोडीअंती रूपये 50,000/- खाजगी इसम श्री. देवेंद्र दिलीप देषमुख, वय 27 वर्षे, रा. के.एल. 5, बिल्डींग नं. 2, रूम नं. 9, सेक्टर 3, कळंबोली, ता. पनवेल, जि. रायगड यांच्या वतीने नागाव ग्रामपंचायत कार्यालयासमोर 14.45वा. स्विकारली म्हणून माझी ग्रामसेवक उदयराज शेळके व खाजगी इसम प्रभाकर मढवी व देवेंद्र देषमुख यांच्या विरूध्द कायदेशीर तक्रार आहे. ( अब्दुलसाबीर अब्दुलहकीम शाह )

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)** **or**

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
नितिमा कुलकर्णी पो.उप.अधिक्षक, ला.प्र.वि.ठाणे.

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिर्का-याचे SANTOSH BALBHIM **Rank (पद):** SI (Sub-Inspector)

**No.(क्र.):** 1234 **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or**

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

Scanned by CamScanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

वरिष्ठ पोलीस निरीक्षक, शिळ-डायघर पोलीस ठाणे, ठाणे शहर

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाम): RAVIKANT DIGAMBAR MALEK/

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): 1234

शिळ-डायघर पोलीस ठाणे



Scanned by CamScanner